**प्रेस नोट**

दिनांक ११/०५/२०२१

| | |
|---|---|
| युनिट | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | शेखर गणपतराव गेडाम, वय अंदाजे–५२ वर्ष, व्यवसाय–नोकरी, पद–पोलीस हवालदार, ब.न. ११२७, वर्ग ३, तैनाती–पोस्टे.गाडगेनगर, अमरावती शहर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती ९०,०००/–रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लाच स्विकारली नाही |
| घटनास्थळ | पोस्टे.गाडगेनगर अमरावती शहरचे मागील बाजुस असलेल्या डि.बी. रुम समोरील मोकळी जागा. |
| घटना ता. व वेळ | दि.२५/०३/२०२१ चे १४:५० वा. ते १५:४५ वा. दरम्यान |

**थोडक्यात हकीकत** :— यातील तक्रारदार यांचे सोन्या चांदीचे दुकान असुन तक्रारदार यांनी पोस्टे. गाडगेनगर, अमरावती येथे डिसेंबर २०२० मध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयातील चोरीस गेलेले सोने आरोपीकडुन विकत घेतले असल्याचे पोस्टे गाडगेनगर येथील लोकसेवक श्री.शेखर गेडाम, पोलीस हवालदार यांनी तक्रारदारास पोस्टेला बोलावुन त्याना सदर गुन्हयात अटक न करण्यासाठी ३० ग्रॅम सोने किंवा ३० ग्रॅम सोन्याची रक्कमेची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे दिली.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.२५/०३/२०२१ रोजीचे पडताळणीमध्ये श्री.शेखर गेडाम यांनी तक्रारदारास तडजोडीअंती २५ ग्रॅम सोने किंवा २५ ग्रॅम सोन्याची रक्कमेची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ९०,०००/–रु. स्विकारण्याचे मान्य केले. तसेच पडताळणीमध्ये लाचेची मागणी साहेबांकडून होत असल्याचे श्री.शेखर गेडाम यांनी सांगीतल्याने साहेबांची पडताळणी करणेकामी दि.११/०५/२०२१ रोजी तक्रारदार यांना पोस्टे गाडगेनगर, अमरावती येथे पाठविले असता, तक्रारदार यांचेवर संशय आल्याने श्री.महेश इंगोले, सहा.पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदारास पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती येथे दि.२४/०४/२०२१ रोजी दाखल असलेल्या अप.क्र. ८७०/२०२१ कलम ३८०, ४५४, ४५७, ३४ भा.दं.वि. या गुन्हयातील चोरीस गेलेल्या सोन्याच्या वस्तू खरेदी करण्याच्या आरोपाखाली अटक केली. दि.२५/०३/२०२१ रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे श्री. शेखर गेडाम यांनी तडजोडीअंती तक्रारदारास ९०,०००/–रु. लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाल्याने गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.विशाल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक श्री.अरुण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष वि.इंगळे, श्री.राहुल तसरे, नापोकॉ.प्रमोद धानोरकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकाना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

( संतोष वि.इंगळे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

OPPO F9 Pro · ©clicked by santosh

Scanned with CamScanner